# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक २३/०५/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक २३/०५/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, विद्युत, विधी व कामगार विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र | विषय |
|---|---|
| | **बांधकाम विभाग** |
| १ | शहरातील ऐतिहासिक पायविहिरींची दुरुस्ती व किरकोळ स्वरूपाची कामे करून सौंदर्यीकरण करणे. |
| २ | सावजी पेट्रोल पंप ते बी. जी. टी. आय. रोड पद्मालय बिल्डिंग पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| ३ | खापरखेडा शिवारात डम्पिंग ग्राउंडवर श्रेडर मशीन करिता शेड बनविणे बाबत. |
| | **विद्युत विभाग** |
| ४ | मलकापूर न. प. अधिनस्त पथदिवे, शाळा तथा इतर न.प. इमारतीचे विद्युत (बिल) देयक अदा करण्याबाबत. |
| | **विधी व कामगार विभाग** |
| ५ | नगरपरिषद मलकापूर चे न्यायालयीन प्रकरणांमध्ये वकिलांची नियुक्ती करणेबाबत. |
| | **शिक्षण विभाग** |
| ६ | अर्जित राखीव रजांचे रोखीकरण करण्या बाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळणे बाबत. |

---

**विषय क्र.१ :- शहरातील ऐतिहासिक पायविहिरींची दुरुस्ती व किरकोळ स्वरूपाची कामे करून सौंदर्यीकरण करणे.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मलकापूर शहरातील पारपेठ, बारादारी तसेच (लालबाग) वानखेडे यांचे शेताजवळ या ३ ठिकाणी ऐतिहासिक अशा पायविहरी असून त्यांचे जतन करणे आवश्यक आहे. सदरच्या पायविहरी भग्नावस्तेत असून त्याची पडझड झालेली आहे. त्यामध्ये गाळ सुद्धा साचलेला आहे. सदरच्या वास्तू या ऐतिहासिक असून भविष्याच्या दृष्टीने सदरच्या पायरींची दुरुस्ती, गाळ काढणे व किरकोळ स्वरूपाची दुरुस्ती करून त्यांचे सौंदर्यीकरण करणे गरजेचे असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदर पाय विहिरींची दुरुस्ती, गाळ काढणे व किरकोळ स्वरूपातल्या दुरुस्ती कामांना व येणारा खर्च १५ वा वित्त आयोग निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र. २ :- सावजी पेट्रोल पंप ते बी. जी. टी. आय. रोड पद्मालय बिल्डिंग पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार न.प. प्रशासकीय सभा ठराव क्र. २१ दि. २७/०१/२०२२ नुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) महाअभियान योजना सन २०२१-२२ अंतर्गत विकास कामे करण्याकरिता कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरात प्रदान करण्यात आली असल्याने सावजी पेट्रोल पंप ते बी. जी. टी. आय. रोड पद्मालय बिल्डिंग पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करून त्यास मा. कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, बुलढाणा यांचे पत्र क्र. मजीप्राविबु/रेचिशा/३३५/२०२२ दि. ०२/०२/२०२२ अन्वये तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. सदर कामास मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे पत्र क्र. ५१८/नवीशा/नगरोत्थान/डे-२०२२ दि. १५/०३/२०२२ अन्वये प्रशासकीय मंजुरात प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार दै. दिव्य मराठी च्या दि. ०५/०५/२०२२ च्या अंकात निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून कमी दराचे निविदा धारक श्री शिवम प्रमोद डवले यांनी अनामत रक्कम भरून स्टॅम्प पेपरवर करारनामा करून दिल्यामुळे त्यांना दि. ३१/१०/२०२२ नुसार कार्यारंभ आदेश देण्यात आला होता व काम सुद्धा सुरू करण्यात आले होते. सर्वे नं. १४५ मधून जाणारा रस्ता हा ले-आउट मधील असून सर्वे नं. १४६ हा अधिग्रहित झालेला नाही व त्यापुढील १४४ मधील भाग हा लेआऊट मधील मंजूर रस्ता आहे.

तरी, अधिग्रहित न झालेल्या रस्त्याचे काम न करण्याबाबत संबंधित मालकाने आक्षेप घेतला असून सर्वे नं. १४५ मधील ले-आउट मधून पूर्ण घेऊन त्यापुढे मधुमालती नगर मधील ले-आउट मधून पद्मालय आपारमेंट पर्यंत घेऊन पुढे बि.जी.टी.आय. रोड पर्यंत जोडल्यास कामाच्या नावात व कामाच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे सदरचा रस्ता हा वरील प्रमाणे वळविण्याच्या कार्यवाहीस ही सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र.३ :- खापरखेडा शिवारात डम्पिंग ग्राउंडवर श्रेडर मशीन करिता शेड बनविणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार खापरखेडा शिवारातील डम्पिंग ग्राउंडवर कचरा विलगीकरण करण्याकरिता श्रेडर मशीन बसवण्यात आलेली असून ती इलेक्ट्रिक वर चालत असते. तसेच त्यावर कोणत्या प्रकारचे शेड बसवण्यात आलेले नाही. भविष्यात पावसाळ्याचे दिवसात पावसामुळे सदर मशीन मध्ये पाणी जाऊन मशीन खराब होऊन ती बंद सुद्धा पडू शकते व कचरा विलगीकरणाच्या कामात अडथळा निर्माण होऊ शकतो. म्हणून त्यावर टीनाचे शेड करणे आवश्यक आहे. त्यामुळे श्रेडर मशीनवर शेड बसवण्याच्या कामास व येणारा खर्च न.प.निधीत जमा होणाऱ्या उपयोगकरता शुल्कातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.४ :- मलकापूर न. प. अधिनस्त पथदिवे, शाळा तथा इतर न.प. इमारतीचे विद्युत (बिल) देयक अदा करण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून प्र. विद्युत पर्यवेक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार विद्युत विभाग अंतर्गत नगरपरिषद अधिनस्त पथदिवे, शाळा तथा नगरपरिषद मालकीच्या इमारतीचे विद्युत बिल तथा शासकीय देयके दंडणीय रक्कम वगळून बारमाही भरावी लागते. सदर शासकीय देयकांचा भरणा ०१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च

२०२४ पर्यंत येणाऱ्या बिलांचा भरणा करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार सदर विद्युत देयक अदा करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च १४ वा वित्त आयोग चे व्याज अथवा १५ वा वित्त आयोग अनुदान निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.५ :- नगरपरिषद मलकापूर चे न्यायालयीन प्रकरणांमध्ये वकिलांची नियुक्ती करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून प्र. विधी व कामगार पर्यवेक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार National Green Tribunal, Pune. व High Court, Nagpur, Bench Nagpur. येथील कार्यालयीन प्रकरणांमध्ये मलकापूर न.प.ची बाजू मांडण्याकरिता तात्काळ वकिलांची नियुक्ती करणे अत्यंत गरजेचे असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच सदर बाबतीत अॅड. अतुल पाठक यांचा विनंती अर्ज न.प.ला दि. ०९/०५/२०२३ रोजी प्राप्त झाला असून अॅड. विलास महाजन, पुणे यांनी सुद्धा न.प.च्या मेलवर वकालत नामा पाठवलेला आहे. त्यामुळे सदर प्रकरणांमध्ये नगरपरिषदेची बाजू मांडण्याकरिता वरील दोन्ही वकिलांचे नेमणूक करणे गरजेचे असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदर न्यायालयीन प्रकरणांमध्ये अॅड. अतुल पाठक तसेच अॅड. विलास महाजन यांची नियुक्ती करण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.६ :- अर्जित राखीव रजांचे रोखीकरण करण्या बाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळणे बाबत..**

उपरोक्त विषयाकरिता मुख्याध्यापक, एम.ए.आझाद नगरपरिषद उर्दू हायस्कूल, मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार एम.ए.आझाद न.प. उर्दू हायस्कूल मधील सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री शेख साबीर शेख लाल हे विहित वयोमानानुसार दि. २८/०२/२०२३ रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांनी त्यांचे मुख्याध्यापकाचे कार्यकाळातील शिल्लक एकूण ११५ अर्जित रजांचे रोखीकरण करण्याबाबत अर्ज केला असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार श्री शेख साबिर शेख लाल हे या शाळेत दि. ०१/०७/२०१५ ते २८/०२/२०२३ पर्यंत मुख्याध्यापक म्हणून सेवेत कार्यरत होते. तसेच श्री शेख साबिर शेख लाल यांच्यावर कोणतेही प्रकारचे प्रशासकीय देणे घेणे बाकी नाही व कोणत्याही प्रकारची चौकशी प्रलंबित नसल्याचे नमूद केलेले आहे. तसेच त्यांचे सेवा पुस्तकांच्या नोंदीनुसार ११५ दिवसांची अर्जित रजा शिल्लक असून सदर अर्जित रजांच्या रोखीकरणाचा प्रस्ताव मंजुरी करिता शिक्षणाधिकारी (माध्य) बुलढाणा अधीक्षक वेतन पथक (माध्य) बुलढाणा येथे पाठवणे गरजेचे आहे.

ठरवण्यात येते की सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री शेख साबीर शेख लाल यांच्या एकूण शिल्लक ११५ अर्जित रजांच्या रोखीकरणाचा प्रस्ताव मंजुरी करिता शिक्षणाधिकारी (माध्य) बुलढाणा अधीक्षक वेतन पथक (माध्य) बुलढाणा यांच्याकडे पाठवण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**